**प्रेस नोट** **दि.०९/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पो.स्टे

## वेश्या व्यवसायातून १३ पीडित मुलींची सुटका

कोरेगाव पार्क पो.स्टे.गु.र.नं.९६/२०१९, पिटा ॲक्ट ३,४,५ मधील पोलीस कस्टडीतील आरोपी नामे रूपेश उर्फ नूतन हरकचंद मुनोत, वय ४३ वर्षे, रा.शितल अपार्टमेंट, फ्लॅट नं.२९, बालाजीनगर, धनकवडी, पुणे याचेकडे पोलीस कस्टडी रिमांडमध्ये केलेल्या चौकशीत त्याने तो व त्याचा साथीदार मंगेश रूद्राक्ष असे दोघे वेश्या व्यवसाय चालवितात. वेश्या व्यवसायातील मुली हया परराज्यातील असून, त्यांना बालाजी लॉज व रोशनी लॉज, येवलेवाडी, बापदेव घाटाजवळ, कोंढवा, पुणे या ठिकाणी ठेवण्यात आलेले आहे. सदर लॉजमध्ये ग्राहकांना वेश्या गमनासाठी मुली पुरविल्या जातात. तसेच ग्राहकांनी इतर ठिकाणी मागणी केल्यास सदर ठिकाणी सुद्धा वेश्या व्यवसायासाठी मुली पाठविल्या जातात, अशी माहिती तपासात निष्पन्न झाली.

दि.०७/०३/२०१९ रोजी नमूद माहितीवरून खात्री करून कारवाईसाठी योग्य त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे, सहा.पोलीस उप निरीक्षक प्रकाश लंघे, कर्मचारी दिनेश शिंदे, हर्षदा शिंदे, संदिप गायकवाड, रियाज शेख, अनिल मंदे, निशीकांत सावंत, मुळे यांनी बातमीच्या ठिकाणी जावून सापळा रचून छापा घातला असता सदर ठिकाणी वेश्या व्यवसायातील १३ मुली वेगवेगळया राज्यातील मुली मिळून आल्या. त्यांची सुटका करण्यात आलेली असून, नमूद वरील वेश्या व्यवसायास मदत करणारे (१)संतोष बालाजी माने, वय २०, रा.बालाजी लॉज, येवलेवाडी, कोंढवा, पुणे (२)अजित संजय वाघुले, वय २२, रा. सदर (३) शिवाजी त्र्यंबक मनाळे, वय २४, रा.सदर (४) सुकुमार शेट्टी, वय ३०, रा.सदर (५) नागेश इंगळे, वय २४ वर्षे, रा. बालाजी लॉज, येवलेवाडी, कोंढवा, पुणे यांना ताब्यात घेवून दाखल गुन्हयात अटक करण्यात आली. तसेच सदर वेश्या व्यवसायात वेश्या गमनाकरिता आलेले ८ ग्राहक यांनाही अटक करण्यात आली. एकूण १४ आरोपींना मा.न्यायालयासमोर हजर करून त्यांची दि.११/०३/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आलेली आहे व १३ पीडित मुलींची सुटका करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.डॉ.प्रीती टिपरे, सहा. पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे व वरील कर्मचारी यांनी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे